# - प्रकरण चौथे -

## ' मातीखालची माती ' व ' उखडलेली झाडे '
## या दोन कथा संग्रहातील
## साहित्य सौंदर्याची उकल

SHIVAJI UNIVER

# प्रकरण चौथे

## ' मातीखालची माती ' व ' उखडलेली झाडे ' या दोन कथासंग्रहातील साहित्य सौंदर्याची उकल .

' मातीखालची माती ' व ' उखडलेली झाडे ' या दोन कथासंग्रहातील साहित्य सौंदर्याची उकल या प्रकरणात केली आहे. त्यासाठी भाषाशैली, निसर्गवर्णने, मानवी मनाची गुंतागुंत, घटना प्रसंगातील कलात्मक सौंदर्य या घटकांच्या अनुषंगाने त्यांचा विचार केला आहे. हे घटक कोणकोणत्या कथेत कोठे-कोठे प्रकर्षाने दिसून येतात त्यांची नोंद येथे केली आहे.

### 1) भाषाशैली

यादवांची भाषाशैली ग्रामीण शब्दांनी संपन्न आहे. आवश्यक तिथेच नागरी भाषेचा वापर केला आहे. त्यांनी या संदर्भात स्वतःच म्हटले आहे -

> " ग्रामीण कथेसाठी ग्रामीण भाषा यशस्वीपणे वापरली तर सकृतदर्शनीच कथा ग्रामीणता धारण करते."[1]

यादवांनी आपल्या कथांतून खास ग्रामीण भाषेचा वापर केला आहे. त्यांनी लिहिलेल्या कथेतून बोलीचे वेगळेपण जाणवते. नागरी भाषेपेक्षा वेगळी असणारी रूपे आपल्या चटकन लक्षात येतात.

उदा. वाघुळ, तोंड, कावकिक, पॉट, सॉस, मुसांडी, सवनं, वाकळ, इस्वाटा, ध्यार, तुडवा, ग्वाड, दाल्ला, पॉर, ढोरं, किनिट, तर्रबतर्र 2

याचबरोबर त्यांची कथा ज्या भागात जन्माला आली त्या भागातील बोली मातीचा गंध घेऊन येते. त्यांच्या कथेत त्या-त्या भागातीलच शब्द विशिष्ट अर्थ घेऊन येतात. असे अस्सल ग्रामीण शब्दही त्यांच्या कथेत आढळतात.

उदा.गिग्गी, रग्गड, डोनगे, आडदाणी, कालवा, कोरडयास, येवदार-येवदार, सुडक्या, मोगा, येशेल, येदूळला, खोप, व्हैक, नटरंगी, रास्टान, किवचने, गिड्डा, कडासनं, सुक्काळीच्या इत्यादी.

यादवांची कथा शेतीमातीशी निगडीत आहे. त्यामुळे त्यांच्यात अनेक शब्द येतात.

उदा. मोट, कनकवळा, नाडा, माळवं, वाकुरं, कडबा, भांगलण, ठेल, काक-या, कोळपं इत्यादी.

तसेच काही खास ग्रामीण वाक्प्रचारांचाही वापर केलेला दिसून येतो.

उदा.गांगरून जाणे, गलबला थांबविणे, काळजात खड्डा पडणे, तग घरणे इत्यादी.

त्याचप्रमाणे त्यांच्या कथेतून म्हणीही आढळतात.

उदा. 1) 'घेटलं तर कानावर फेकलं तर वा-यावर'

2) 'जोगतिण देवाची नि बायको गावाची'

नादानुकारी कृती करणा-या शब्दांची निर्मिती करण्यासाठी माणूस आपला अनुभव प्रकट करतो. त्यामध्ये नेमकेपणा असावा लागतो. असे शब्द जास्तीत जास्त ग्रामीण माणसात दिसतात.

उदा. टराटर, चुरचुर, गुरगुर, टकमक, चुटूचुटू, टुनटुन, तुरूतुरू इ.

दादा फिटीऽटा मारतोय.

आणि आपला रागलोभ व्यक्त करण्यासाठी कोणताही संकोच ते पाळीत नाहीत.

उदा.1)'हयेला पटकीचा फोड उठला हयेला.'

2)'भाडया लुगडं नेसून बायकात घुसला'

3)'उठ की गं रांडं'

4)'निजा की गं सटवाया हो ।'

5)'माझ्या जलमावर मुतलं कुतरं'

वाक्प्रचार, म्हणी, शब्द हे सर्व पाहिल्यानंतर पुस्तक वाचत असताना आणखी एक शब्द आढळला.

उदा.' हात धराय गेलं तर तू रोडकं, मानगूट धराय गेलं तर बोडकं '

2) **निसर्गवर्णने**

यादवांची कथा ही शेतीमातीशी निगडीत आहे. कथेचा शेती हाच मुख्य घटक असल्याने तेथे निसर्ग येणे साहजिकच आहे. निसर्ग हा त्यांचा अविभाज्य घटक आहे. म्हणून या कथेतील निसर्ग पहाणे आवश्यक आहे.

" हाताबुडी आलेला शिवा " ( मातीखालची माती ) यात बैलांना गवत कापून आणायचं होतं. पावसाळयात रानातनं घोटयापर्यंत चिखल झालेला असतो.

' चव्हाणाचा आबामा ' यात पावसाळा जवळ आल्यामुळे त्यातून वळवाचा पाऊस पडल्यामुळे आंब्याची झाडं निम्मी-अर्धी झडत होती.

'बापू' मध्ये पावसाळयात रानात सगळं हिरवंगार दिसतं. पिकं अगदी ठेल धरलेली असतात. सगळा बांध गवतानं डोलत असतो. झाड-झुड हिरवेगार झालेले असते.

' बाबजी बल्लाळ ' मध्ये बाबजीने आपल्या खोपीसमोर आंब्याची दोन रोपं लावली होती. त्या रोपांना तो रोज पाणी घालतो. दादा बाबजीला म्हणतात -

" ही रोपं जगली तर फळं यायला दहा-पंधरा वरसं लागतील. कशाला उगंच केसं तुटूस्तर रोपास्नी पाणी घालतोस " (पृष्ठ 90)

कारण या आंब्याच्या रोपाला एक पान फुटलं तर अंगाला पान फुटल्यासारखं वाटतं. माझं झाडा-झुडपावर मन बसलय.

यातुन त्याला निसर्गाबद्दल किती ओढ आहे हेच दिसते.

' भाडेकरू दत्तू ' मध्ये झिम्‌ पाऊस पडतो आहे. पावण्या गळायला थोडावेळसुध्दा लागला नाही. माणूस कोणी बाहेर पडत नव्हता. काळं-काळं करंद ढग भरल्या मोटेगत गळत होते. भांगलणी, खुरपणी सगळया थांबल्या. पावसात भिजायचं, काकडून चुलीपुढं बसायचं.

असे हे पावसाचे वर्णन निसर्गाच्या रूपाने आपणास दिसते.

'खुळा इठू ' यात पंधरा दिवस झिम पाऊस पडला. घरातनं तोंड बाहेर काढण्याची सोय नव्हती. शेतीतील कामे खोळंबली. भांगलण - कोळपणी भिजत पडलेल्या.

' लंगडा गोपा ' या ही कथेत निसर्ग दिसतोच. पण अशा काही कथा आहेत की त्यामध्ये पाऊस येण्यापूर्वीची, पाऊस पडत असताना आणि पाऊस पडून गेल्यानंतरची अवस्था चित्रित केली आहे.

'मातीखालची माती ' यातील निसर्गवर्णने चित्रित केल्यानंतर 'उखडलेली झाडे' यातील निसर्गवर्णने पहाणे आवश्यक आहे.

'फाटयाचं पाणी' (उखडलेली झाडे) कॅनॉलला पाणी आलं आणि लोकांचे भाग्य उजाडले. सगळीकडे हिरवेगार दिसत होते. त्या हिरवेपणात कुणाचं रान कुठे आहे याचा पत्ता नव्हता. त्यामुळं सगळं सलग हिरवंगारच दिसायचं. बांधावर आंबे, नारळी, कळकाची बेटे, निंब-बाभळीची झाडं वा-याबरोबर झुलत होती.

कॅनॉलला पाणी आले. पिकांना भरपूर मिळाले. सगळीकडे हिरवेगार झाले.

' हिरवी संस्कृती ' मध्ये प्रा. भोईटे यांना शेतमळयाबद्दल अतिशय आवड आहे. ते व्यवसायाने प्राध्यापक असल्यामुळे त्यांना सतत शेताकडे जाता येत नाही म्हणून त्यांनी आपल्या परडयात भाजीपाला लावला.

ग्रामीण भाग म्हटले की, निसर्ग हा आलाच. खेडयातून निसर्गाबरोबरच चालणारी सावकारी आणि गरीब शेतक-यांचे पावसावर अवलंबून असलेले जीवन यांचेही चित्रण घडते. यादवांच्या कथेतील पात्रेच निसर्ग म्हणून आपली छाप पाडतात.

### 3) मानवी मनाचे चित्रण

संस्कृतीच्या मुळाशी परिस्थिती किंवा अन्य बाहय घटक महत्वाचे असतात आणि या सगळयातून व्यक्त होणारे मानवी मनही महत्वाचे असते. हे मानवी मन गुंतागुंतीचे असते. म्हणून आपणास ग्रामीण माणसाच्या मनाचे चित्रण पहावयाचे आहे.

'हातबुडी आलेला शिवा ' (मातीखालची माती) मध्ये शिवा लहान वयात काम पडल्यामुळे एकदम त्रस्त झालेला आहे. तो आपल्या भावाला म्हणतो, " तू आपला पोट भरत-भरत शिकतोस ते बरं आहे. मी आपला दादाच्या, बैलाच्या आणि कामाच्या तडाख्यात सापडलोय "

त्यावेळी लेखक म्हणतो -

" दुरवळाचे दिस आहेत काढले पायजेत."

तेव्हा शिवा म्हणतो -

" किती काढायचं ? कायमचाच दुरवाळ हाय आमच्या घरात. मला तर हे मळयातलं काम बघून पळून जावं असं वाटतंय --- दोन तीन म्हयनं झालं, कूप लावताना पायात पळकीचा काटा बोटाच्या पेराइतका आत घुसला. कुजका हुता तसाच आत मोडून बसला. म्हयनाभर हिकडचं तिकडं करू देईना. पाय सुजून दुधग्या भोपळयागत झाला. म्हयनाभर घरात -हायलो --- पाय दुखायचा; खरं सुखानं घरात बसायला मिळालं, तेवढाच माझ्या जल्मात इसावा बघ --- पू झाल्यावर काटा बाहीर आला नि सात-आठ दिवसात काम डोंबलावर बसलं." (पृष्ठ 13)

यातून शिवा वयाने लहान असूनसुध्दा काम जास्त असते. त्याच्या मनातील वेदनाच आपल्याला जाणवतात.

'बापू' मध्ये बापू हा जातीने मांग आहे. तो मनाने प्रामाणिक आहे. तो चोरी करतो याचा कुणालाही पत्ता लागत नाही. एखादयावेळी चतुर डोळयांचा शेतकरी धावत येतो आणि म्हणतो -

" बापू भेंडया तोडल्यास न्हवं का हया ताटव्याच्या ?"

तेव्हा बापू म्हणतो -

" हे ऽ ऽ ऽ चार घेटल्या गा दिसतानं. कोरडयाशाला काय न्हवतं."

मग शेतकरी भेंडया बापूकडून घेतो. तुझ्यासाठी घातल्या नाहीत, चोरून खायाच्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

वाटणीचं रयान खावं असं म्हणतो. तेव्हा बापू विशिष्ट तारेत बोलतो.

"अं ऽ ऽ। काय खावं गा आम्ही मग ? आम्हांस्नी कां इनाम हाईत व्हय. रयता हो ?" (पृष्ठ 31)

यातून कारू-नारू संस्कृतीतील गाय व वासरू का ? तर गाय म्हणजे शेतकरी व वासरू म्हणजे ही बापू सारखी मंडळी. यांना द्यायाला नको कां ? असे हे बापूचे मन दिसते.

शेवटी धनगरांच्यातलं एक कोकरू मारतो व पुरून ठेवतो. हे दादांना समजल्याकर दादा नाराज होतात. तेव्हा बापू हसत-हसत म्हणतो -

"न्हाईगा, उन्हाळयाचं दिस. कुठंच हात सरकंना. पोटालाबी काय न्हवतं --- काय करतोस । जगलं तरी पाहिजे. हे पोट गप बसू देतंय व्हय ?" (पृष्ठ 39)

यातून पोटाला काही नव्हतं म्हणून चोरी केली. पोटासाठी काहीतरी केलं पाहिजे असे बापूचे मन आपणास जाणवते.

' आक्कुमावशी ' यात आक्कुमावशीच्या दारात मुलं खेळत होती. त्यात गोपाळचा मुलगाही खेळत होता. तेव्हा त्याच्या गळयातील सोन्याची पेटी पडते. ती पेटी आक्कुमावशी घेते. तेव्हा ती म्हणते -

" बाबा पोटाला न्हवतं; म्हणून मी घेटली, परगावासनं आलेल्या एका बाईला इकली. तिचं नाव गाव मला ठावं न्हाई. इसावर पाच रूपयला इकली. सात रूपय म्या खाल्लं. उरल्यालं बाकीचं तुला घरात गेल्यावर देते. चल घराकडं." (पृष्ठ 47)

यात आक्कुमावशी प्रामाणिक आहे. पेटी घेतली व ती विकून थोडे पैसे घेते व उरलेले परत करते. हे तिचे मोठे मनच दिसते. मातीखालच्या मातीच्या डूबीत प्रामाणिक मनाची माणसं आहेत.

'सखाराम' मध्ये सखाराम हा जोगता आहे. तो खरा पुरूष पण त्याच्या भावना या

बाईच्या होत्या. त्याला सतत वाटायचे आपणाला स्त्रीपण यावं. त्याची यल्लुबाईवर फार श्रध्दा होती. एक दिवस त्याला स्वप्न पडलं. सुंदरपैकी लुगडं नेसलं आहे. यल्लमा समोरच्या देवळातनं झाडापाशी आली आहे. त्याला तिनं बाईचं रूप दिलं. सखाराम त्यावेळी यल्लमाच्या डोंगराला गेला होता. त्यावेळी त्याला हे स्वप्न पडलं. स्वप्नातून एकदम जागा होऊन म्हणतो -

" आई यल्लूबाई, मला ही वासना काय म्हणून दिलीस ? का छळ मांडलाईस माझा ?" (पृष्ठ 77)

यातून सखारामचे निराश झालेले मनच दिसते.

" बाबजी बल्लाळ " यात बाबजी हा प्राणीमात्रावर जीवापाड प्रेम करतो. तो शेतात जरी गेला तरी शेरडं, कुत्री त्याच्याबरोबर असतात. एकदा बाबजीच्या कुत्रीला पाच पिल्लं झाली. ती पिल्लं इलायती कुत्र्यासारखी तरतरीत. त्यावेळी दुपरीचा पाटील एक कुत्रा विकत मागतो.

" पाव्हण्या शंभर रूपय देतो; कुत्रं एवढं दे."

तेव्हा बाबजी म्हणतो -

" न्हाई बाबा, पोरागत पाळल्यात मी."

रोजगारी माणूस दिसतोस सात-आठ महिन्यांची पोटगी तुझी निघल. असे पाटलाने म्हटल्यावर पुन्हा बाबजी म्हणतो -

" निघली तरी काय करायची मला ? मायेला मोल न्हाई." (पृष्ठ 85)

यात बाबजीचं मन प्राणीमात्रावर किती जडले आहे हेच जाणवते.

" फुलाआत्या " या कथेत फुलाआत्ती ही तोंडगळ असली तरी मनाने मोठी आहे. ती गावातल्या बायकांची बाळंतपणे करते. सुनेला सहाही मुलीच झाल्यानंतर छळ करणारी फुलाआत्ती सातव्यांदा मुलगा होतो तेव्हा म्हणते -

" लई छळली बाई मी तुला. आता सुखानं बसून खा." (पृष्ठ 102)

' भाडेकरू दत्तू ' मध्ये दत्तूम्मा हा दुस-यांच्या शेतात बैल, औत घेऊन रोजावारी

काम करणारा असतो. गळयाला घाम येईपर्यंत काम करत असतो. त्याच्या डोक्याचा पटका फाटलेला असतो. त्यामुळे लोक हसतात. त्यातूनच कुणीतरी चिंधूक फाडून घेतो. त्यावेळी दत्तूम्मा म्हणतो -

" गप बसा की मरदा हो. तुमच्यावाणी मला बापा घरचं वतन न्हाई. भाडेकरू माणूस मी. हातावर संसार झेपावा लागतोय मला चौघाजणांचा" (पृष्ठ 107)

मी भाडेकरू आहे. जवळ पैसा नाही याची त्याच्या मनाला जाणिव होते असे दिसते.

'पोरका दिन्या' यात दिन्याला आई-वडील नसतात. तो गणपूच्यात कामाला लागतो. तिथे त्याला व्यवस्थित वागवत नाहीत. लेखकाचे वडील दादा ज्यावेळी त्याला आई-वडील कुठे गेली विचारतात. तेव्हा आईला तिच्या नव-यानं नेली. तो माझा बा नव्हता असे म्हणत असतो. तेव्हा दिन्या म्हणतो -

" म्हंजे आमची आई आता ज्येच्यापाशी हाय; त्येची खरी बायकू. पर तो लगीन झाल्यावर एक दोन वर्सातच एका खुनाच्या मारामारीत सापडला नि त्येला जन्मठेप झाली आणि कुठल्यातरी मुलुखाला त्येला न्हेलं. आईला वाटलं जलमठेप म्हंजे जलमभर तुरूंगातच -हायाचं आणि तुरूंगातच मरायचं. म्हणून त्यो गेल्यावर ती तिथं एक-दोन वरसं -हायली नि गम हिकडं तोंड घेऊन आली. हितं आल्यावर बिन लग्नाचीच भैरू चिखल्याजवळ -हायली. मग मी जलमलो. भैर चिखल्या माझा बा ---- त्येला जित्ता धरून खड्डयात पुरला पायजे." (पृष्ठ 124)

त्यावेळी कोवळा जीव असणा-या दिन्याच्या मनाची अवस्था मनाला एकदम चटका लावून जाते.

' धोंडबा खादाडया ' मध्ये गणा आणि धोंडबा हे दोन सख्खे भाऊ. त्यातला धोंडबा हा लहान असतो. तो सतत खात असतो. आपल्या बायकोला तो खादीपायी मारत असतो. त्यातच तिला हाडांचा रोग होतो. डॉक्टरांनी ऑपरेशन करावे लागेल म्हणून सांगितलेले असते. पण धोंडबाजवळ पैसे नसल्याने काय व्हायचं ते होऊ दे. तेव्हा धोंडबा म्हणतो.

"मग काय। खंगली खंगली नि आज मोकळी झाली. मेली, बरं झालं .. लई हाल सोसलं तिनं अन्नाइदमान उपाशी मेली, हरघटकेला माझा मार खाल्ला. हूं न्हाई की चू न्हाई .. माझा सोभाव एक खादाड, त्येच्या भणं. कवा येक्स्थीशीर आन्न तिला मिळालं न्हाई". (पृष्ठ 154)

यातून बायको मेल्यानंतर धोंडबाच्या मनाला जाणीव झालेली दिसते.

* 'खुळा इठू' या कथेमध्ये इठू कामाला प्रामाणिक आहे. वेडाच्या लहरीत काहीही बडबडत असतो. बायको आपली नाही आणि मुलगाही आपला नाही असे त्याला वाटते. तेव्हा म्हणतो -

" .. शिव-या तिडा क् धिन। बायकू तिडा क् धिन। संसार तिडा क् धिन। कोण कुणाचं? गाडगी मातीची। चकार कुंभाराचं।.. माझ्या घरात येऊन बसल्यात ... आरं चा ल। संसार कुणाचा? बायकू कुणाची? ..पॉर कुणाचं? झुक झुका क झ्याक्। कोण हाय कुणाचं? आरं चा ल। (पृष्ठ 169)

यातून विठूचे बायकोच्या संशयाने पछाडलेले मनच दिसते.

"लंगडा गोपा" मध्ये गोपा हा जातीने मांग आहे. पायाने अधू असला तरी सतत काम करत असतो. मालक थोडं शिळ-पाकं कोरडयास द्या. नाही म्हटलं की कवळं कांदं द्या. तेही नाही म्हटलं की कांद्याच्या पाती घेऊ का? असे विचारत असतो. त्याची चिकाटी बघून होकार द्यावा लागतो. तेव्हा गोपा म्हणतो -

"कायंच न्हाई हो. नुसती बुकणी घाटलीया बघा बायकूनं .. कुत्र्याव्रगत जलम आमचा". (पृष्ठ 172)

यात आम्ही रोजगारी आहे. गोपा हा आपला मुलगा मेला हे सहजपणे सांगतो आणि त्याच्या तिस-या दिवशीच काम मागायला जातो. कामाला कसा येशील विचारल्यावर म्हणतो -

"त्येला काय हुतंय? पोटाच्या पाठी लागून ते मेलं. आम्हीबी एक दीस मातीआड व्हायचं पॉट-पॉट करत।" (पृष्ठ 182)

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR
BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

कष्ट करून जगणा-या दरिद्री माणसाच्या जीवनाचे सत्यच यातून सांगितले आहे.

"मातीखालची माती" या कथासंग्रहातील व्यक्ती दारिद्रयाने पिडलेल्या असल्या तरी मनं मोठी आहेत. यापेक्षा अधिक सखोलतेने चिंतन 'उखडलेली झाडे' मध्ये आढळते.

"गावचा मुख्यमंत्री" (उखडलेली झाडे) मध्ये कथेचा नायक छ-या हा बाळासाहेब भुजबळाकडे प्रचाराचे काम करतो. तो बाळासाहेबाचा कार्यकर्ताच म्हणून वावरत असतो. दौ-याच्या आदल्या दिवशी शरदला कपडे आणतो. पण शरद कपडे घालण्यास नकार देतो. तेव्हा शरद म्हणतो -

"दादासाहेब, मला गरिबाला असली किंमती कापडं कशाला? हाईत नशिबात तीच बरी?" (पृष्ठ 1)

यातून आपली परिस्थिती चांगली नाही. त्या परिस्थितीची शरदला जाणीव आहे.

गावचे लोक शरदला मुख्यमंत्री म्हणत असत. म्हणून मुर्तुल्याचा दुंडाप्पा शरदरावांना विचारतो. "काय शरदराव, खरंच तुम्ही म्हा राष्ट्राचे मुख्यमंत्री एक म्हैनाभर झालासा तर पैल्यांदा काय करशीला?" तेव्हा शरद म्हणतो.

"पैल्यांदा मी माझ्या घराचं छप्पर दुरूस्त करून घेईन. लई गळतंय त्येच्या आयला! पावसुळयात निजायलाबी जागा मिळत न्हाई. तसंच निवडणूकीच्या काळात मला जसं खायाला मिळालं तसं ताजंताजं अन्न माझ्या पोरास्नी या काळात म्हैनाभर पोट फुटूस्तवर खायला घालीन, मग त्यात ती मेली तरी हरकत न्हाई. त्येंच्या जिवाला शांती तरी मिळंल .. आणि एक करीन माझ्या गावच्या शेतक-यास्नी मला नि माझ्या 'लोकशाहीला' रोजच्या रोज रोजगाराचं काम दिलंच पाहिजे, असा कडक कायदा करीन".

आणि त्याही पुढे जाऊन म्हणतो -

"आणि माझ्या 'लोकशाहीला' एक नऊवारी नवं लुगडं घेईन. एकदा तरी तिची लाज झाकून तिला नटवावी म्हणतो. अगदी इंदिरा गांधीगत नटवायचा इचार हाय।" (पृष्ठ

11)

यातून आपल्याला जसं रोजगार करून अन्न मिळालं नाही आणि भुजबळाकडे काम करूनसुध्दा पोटभर खायला दिलं नाही. तसं आपल्या मुलांचं व बायकोचं होवू नये असे त्याच्या मनाला वाटत असावे असे दिसते.

"भोवळ" या कथेत, कथेचा नायक रावसाब हा बी.कॉम्. झालेला आहे. नोकरी नाही म्हणून बेकार असतो. शिक्षण, पदवी त्याला व्यर्थ वाटू लागते. तेव्हा तो म्हणतो -

"जन्माची चौथाई शिकण्यात गेली. भणी..भावंडापेक्षा मीच नशिबवान म्हणायचा .. आईला खोटी आशा लागली नि माझी एवढी वर्स सुखाची गेली. पोटपाणी दोन वक्ताला भागलं नि कापडं मिळाली. सगळयांनी जिवाचं रान करून माझं शिक्षण पुरं केलं. मी बी लडदू होऊन खुळयागत शिकलो". (पृष्ठ 14)

यातून रावसाबच्या मनाला आपण बेकार असल्याची टोचणी लागली आहे हेच दिसते.

"कष्टाची लक्षुमी" मध्ये गंगाराम वारल्यानंतर त्याची बायको मुलांना कष्ट करून वाढवत असते. गंगारामने ज्या विहिरीत जाऊन जीव दिला त्या विहिरीत वाकून बघते आणि तिच्या डोळयात पाणी येते. तेव्हा म्हणते -

" .. बरं केलंसा, जिवाचं कडासनं घालवून सोनं झालासा. पर मी आता हितं काय करू? तुमच्या मागोमाग आली असती पर हया पोराचं काय? .. आणि जिती -हाऊन तरी हयेंच्या तोंडात काय आणून घालू?" (पृष्ठ 31)

यातून नवरा मेल्यानंतर तिच्या मनाला झालेली वेदना आपले हृदय हेलावून सोडते.

"फाटयाचं पाणी" यात लक्ष्मण मोरे हा सैनिक असतो. हिंगेसाहेब त्याच्याकडून पैसे मागतो पण तो द्यायला तयार नाही. हिंगेसाहेबाच्या ऑफिसकडे जाऊन येतो. तेथून संध्याकाळी काशीनाथकडे जातो. काशीनाथचे वडील गणूमा असतात ते सांगतात. लक्षू नवं राज आलंय, ती मोठी

माणसं आहेत देऊन टाक जा. उन्हाळयात पिकं घ्यायची तर पाण्याशिवाय येणार नाहीत. पाण्याचे ते मालक, तेव्हा पाण्याची वाटणी गेली असं समजून देऊन टाकायचं. तेव्हा लक्षू म्हणतो -

"पर, गणूमा, पाणी काय हयेंच्या बापाचं न्हवं" (पृष्ठ 40)

पुन्हा गणूमा म्हणतो -

"ते सगळं खरं आपण वर्षभर राबायचं, पिकं घ्यायची. बी रूजले की पिकं येतात. तरीही म्हसोबाला कोंबडं देतो तसंच काहीतरी म्हणून देऊन टाकायचं".

त्यावर लक्षू म्हणतो -

"पटत न्हाई गणूमा, जमीन गावाच्या मालकीची ही गावं दुस्काळी म्हणून सरकारनं हितनं केनाल काढलाय. हयो हिंगेसायेब ना हितला, ना तिथला, शेरगावासनं नोकरीला आलेला कुत्ता. सगळया गावानं एक मूठ केली तर हयेला शिवंपार हकलायला किती उशीर लागणार हाय?" (पृष्ठ 40)

यात आपण सैनिक आहोत. सगळं गाव एकत्र जमलं तर त्याला हाकलून लावता येईल असे त्याच्या मनाला वाटत असावे आणि त्यातूनच लक्षूनं अँटीकरप्शनकडे घेतलेली धाव बघून हिंगेसाहेबाने केलेली चकवाचकवी त्यामुळे ग्रामीण समाज भरडून निघतो. हे ग्रामीण समाजातलं वास्तव आहे. ते आनंद यादवांनी समर्थपणे येथे मांडले आहे आणि माणसाच्या मनातील खळबळ येथे व्यक्त झाली आहे.

"फळया आणि पारंब्या" मध्ये बाबासाहेब सुतखंडयांची सूनही राजकारणात रस घेणारी असल्यामुळे कोणता माणूस कसा आहे हे ती बरोबर ओळखते. मुकुंदराव फटफटीचा कडकडाट करत गेल्यावर वहिनींना वाटते की -

"भूकंपच झाला, आता तो जिल्हयाजिल्हयातून राज्यात जाईल, मग राज्याराज्यातून देशभर पसरेल, सगळयांनाच हादखून टाकील .. भेगा, फटी, चिरफळया करणारी

SHIVAJI UNIV

ही नकाराची करवत कुठं कुठं फिरते कुणास ठावूक?" (पृष्ठ 63)

यातून वहिणीसाहेबांचे मन माण्सं ओळखण्याइतपत समर्थ झालेले आहे. राजकीय परिस्थितीवर या वहिणीसाहेबांनी चिंतन केलेले आहे याची जाणीव होते.

"आंघोळीचा दिवस" मध्ये कथेचा नायक दिवाळीची आंघोळ आटपून, फराळ करून, अण्णा सांगतात म्हणून पसारे वस्तीतनं जातो. पण त्या पसारे वस्तीत दिवाळीच्या आंघोळीचा कुणालाच पत्ता नव्हता. म्हशींनी रस्त्यावर टाकलेल्या पोवावर माशा घोंगावत होत्या. चार धाटं छपरावर टाकून सावली केलेल्या उघडया मांडवात म्हसरं बैलं, गवताच्या पेंढया खातेली. त्यात गोब्यात शेणामुताची राड, त्या घाणीतच बायका धारा काढीत आहेत. शेणाची पाटी उकीरडयावर टाकली की, माशा घोंगावून उठत आणि पोरं तर शेंबुड हातांनी पुसून तो हात फाटक्या चड्डयांना पुसत खेळत होती. रस्त्याच्या कडेला परसाकडंला बसत. त्याच घाणीत कुत्री उब घेऊ पहात होती. पाटाचं पाणी आणून सगळया गावाला धुवून काढावं असं त्याच्या मनाला वाटत होतं. पण त्याच वस्तीत असणारा आपल्या जातकुळीतला शंकर राहतो. त्याची अजून आंघोळ व्हायची आहे. शंकर पुढे जावा म्हणून सांगतात तेव्हा कथेचा नायक म्हणतो -

"न्हाई, मी मळयाकडंच जाणार हाय. चलतो फुडं आंघुळ हाय, अजून ववाळायचं असंल. च्याऽपाणी, फराळ करून ये काय गडबड न्हाई?" (पृष्ठ 74)

यातून कथेच्या नायकाच्या मनाला आपण बोलता बोलता बोलून गेलो. शब्दांच्या संगतीनं शब्द एकामागोमाग एक आले. ही मनाला टोचणी लागते. या सगळया विषम परिस्थितीला जबाबदार कोण यावर नायकाचे चिंतन सुरू होते.

"चावीचं पाणी" मध्ये कृष्णा हा शिकलेला आहे. शिकूनसुध्दा नोकरी मिळत नव्हती रोजगार करायचा तर शिकलेला आहे. म्हणून रोजगार कोणी देत नाही. त्यातूनही आईचा रोजगार सुटत नव्हता. म्हणून कृष्णा म्हणतो -

"एवढं शिकून शेवटाला मी बी रोजगा-याचाच झालो हुतो". (पृष्ठ 79)

यात आपण शिकून बेकार असल्याची जाणीव कृष्णाच्या मनाला होत होती.

दोन-तीन वर्ष जातात आणि नोकरी लागते. नोकरी सुरू होऊन दोन-तीन महिने झाल्यावर आपल्या घरात कृष्णा चावी घेतो. जास्त पैसे खर्च करू नको म्हणून आई त्याला सारखे गावाकडे येऊ देत नाही. परत दीड वर्षानं येतो. चहा पिऊन झाल्यावर परडयातली चावी काय झाली म्हणून विचारतो, आई म्हणते, चावीपट्टी दिली नाही म्हणून बंद केली आहे. कृष्णा महिण्याला 70 रूपयाची मनिऑर्डर करत होता ते त्याच्या आईने साठवून ठेवलेले असते कृष्णाने कां म्हणून विचारल्यावर आई म्हणते -

"किसना, आम्हां रोजगा-या मानसाला काय करयचं असलं नखरं? हिशेब केला तर माझ्या एकटीचा म्हैनाभराचा रोजगार त्या पाण्यात जाईत हुता. मला काय इनामदाराच्या हिरीचं म्हैनाभर पाणी वडाय लागत न्हाई. माय लेकींनी दोन खेपा केल्या की रग्गड हुतयं. रोजगाराला जायाच्या रक्तापतोर दोघींच मिळून किती पाणी वढून हुईल? न्हयारीच्या रक्तापतोर काय काम असतंय आम्हास्नी? घरात बसून पाणी पिऊन करू काय? घा सर्व ती चावी वापरली तर हे घर इकून पैसं भरावं लागतील परवडलं तरी पायजे". (पृष्ठ 86)

यातून कुठल्याच रोजगा-याच्या नशिबात चावीचं पाणी नाही. तर आईच्या नशिबी ते कसं असणार. कारण आई म्हणते तेच बरोबर आहे. असे त्याच्या मनाला वाटते.

"सत्काराचा नारळ" मध्ये रेवणकुंभार कारागिर आहे. बाळासाहेब रेवणचा वर्गमित्र असल्यामुळे गणेशोत्सवात गणपतीची मूर्ती बनवण्याचे काम त्याच्याकडे द्यायचे यावर चर्चा चालू होती. रेवण म्हणतो -

"चर्चा ऐकली नि मला आश्चर्याचा धक्का बसला. साडेपाचशेची ऑर्डर म्हणजे थोडी नाही. दिडेकशे रूपयांचा माल लागेल. माझे पंधरावीस दिवस तरी त्यात जातील. पंधरा दिवसात चारशे रूपये म्हणजे काही कमी नाही. आज रोजगा-यांना पाच-पाच रूपये मजुरी मिळती. मला त्याच्या पाचपट पडेल. कला असली म्हणून काय

झालं? कोण विचारतोय हया गावात माझ्या कलेला नि माझ्या पदवीला तरी? मी रोजगारीच. पंधरा दिसांसाठी रोज पंचवीस रूपये रोजगार काय कमी झाला? प्रत्येक वर्षी अशी ऑर्डर मिळाली तर भावंडांना चार दिस सुखाचे येतील. बाळासाहेब म्हणतोय तशी कला दाखवायलाही संधी मिळेल. हळूहळू लोकांना कळेल की कोल्हापूरच्या मूर्तिकारांच्या तोडीचा मूर्तिकार हया गावात आहे. एक दिवस नशीब उजाडेल. कदाचित नोकरी न मिळण्यात, माझ्याच धंद्यात मला गुंतविण्याचं परमेश्वरी काही भाकीतही असेल. बाळासाहेबाच्या रूपानं त्यानं ही संधी दिली असेल?" (पृष्ठ 89)

यातून बाळासाहेब हा वर्गमित्र असल्याने मित्रत्वाला जागला असे त्याच्या भाबडया मनाला वाटते.

हे सर्व वाटूनसुध्दा शेवटी गणेशोत्सवाच्या शेवटच्या दिवशी मूर्तीला झालेले खर्च धरून उरलेले देणगी म्हणून जाहीर करतो आणि सत्कारात त्याला नारळ देतो. तेव्हा म्हणतो -

"माझे पाय कोलमडल्यागत झाले, एक महिना फुकट गेला होता. तीन-चार भावंडाचा, म्हाता-या आईचा तोंडातला एक महिन्याचा घास मी काढून घेतला होता. सगळा मातीत गेला". (पृष्ठ 96)

यात त्याच्या मनाला एक प्रकारची वेदना होते असे जाणवते.

"शेवटचं पायताण" यामध्ये लेखक पुण्यासारख्या शहरात राहतात. शहरात रबराची चांगल्या डिझाईनची चप्पल मिळते. तरी ती टीकत नाही म्हणून चप्पल बांधण्यासाठी तुकाम्मा चांभाराकडे जातात. तुकाम्मा स्टँडवर चांभाराचे काम करत असतो. लेखक तुकाम्माला म्हणतो -

"म्हातारपणी काय चाललंय हे? गप घरात बसून खायाचं न्हाई आता?"

तेव्हा तुकाम्मा म्हणतो -

"घरात बसून कोण घालणार? वतनं हाईत व्हय आमची? का जलमभर गावाची

खेटरं सांधली म्हणून आम्हास्नी कुणी पेन्सूल देणार हाय?" (पृष्ठ 103)

बारा बलुतेदारांपैकी हा तुकाम्मा चांभार आहे.

"उद्योग वसाहत" या कथेत पांढरपेशा असणा-या कामतबाईंना, शांताबाईंचा मुलगा आपल्याकडे कामाला राहिल तेवढीच तिला मदत होईल असे वाटते. तो त्यांच्या घरात कामाला राहतो. कारण या घरात उठायला-बसायला मिळेल, हिंडायला-फिरायला मिळेल असे त्याचे भाबडे मन म्हणत होते.

तेरा-चौदा वर्षाचा चंदू कामतांच्या घरी रूळत चालला होता. कारण त्याला तेथे सर्व काही मिळत होते. त्याभरात कामही भराभर होत होते. अंगाच्या लक्स साबणाचा वास दरवळत राही. तेथून जाताना, इकडून-तिकडं करताना चंदूच्या नाकात शिरे आणि डोळे त्या साबणाच्या सुगंधाने मिटत. सणाला आपण साबण लावून कपडे धुतो पण या घरात रोज साबणाचा सण, त्यातून हात धुवायचा असला तरी वासाचा साबण हे सर्व पाहिल्यानंतर चंदूच्या मनाला वाटतं आणि मनातल्या मनात म्हणतो -

".. देवा, जलमभर त्याचं घरातली कामं मिळू देत. हयाच घरातलं खायाला मिळू दे. एक वक्ताला जरी हया घरातलं पोटभर खायला मिळालं तरी हाय त्यापेक्षा मी दुप्पट-तिप्पट हुईन.." (पृष्ठ 122)

यातून चंदूचे भाबडे मनच आपणास दिसते.

"नवा हिशोब" मध्ये दिना कोल्हापूरला डबे पोहोचवण्याचे काम करतो. ऊन म्हणायचं नाही की पाऊस म्हणायचा नाही. झेपलं नाही तरी काम करायचच. म्हणून म्हणतो -

"झेपलं न्हाई तर मग करणार काय? शिक्षणाची राख झालीय नि नोकरीचीबी आशा सुटलीय". (पृष्ठ 133)

त्याच्या मनात शिक्षणाची आवड असून शिक्षण नाही आणि शिक्षण नाही म्हणजे नोकरीही नाहीच. याची त्याच्या मनाला कुठेतरी जाणीव होते हेच दिसते.

"हिरवी संस्कृती" यात प्रा. भोईटे यांना आपल्या शेताबद्दल अतिशय ओढ आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

पुण्यात राहायला आल्यापासून त्यांना सारखं तिकडे जाता येत नाही. कारण अर्थशास्त्राचे पुस्तक लिहायला त्यांनी घेतलेले असते. हे काम पूर्ण करावे असे त्यांच्या पत्नीला वाटत असते. पण भोईटे म्हणतात, झाले तर करू नाहीतर पैसे परत देऊ आणि पुन्हा पत्नीला म्हणतात -

"तुला काही कळायचं .. नुकसानीत आली तरी शेती टिकवली पाहिजे". (पृष्ठ 156)

प्रा. भोईटयांचे शेतीत मनच गुंतले आहे हे दिसते.

"पाषाणाची माणसं" मध्ये जंगमसाहेब हे व्यवसायाने कॉंट्रॅक्टर आहेत. भरपूर वैभव असूनसुध्दा गरिबांबद्दल कळवळा आहे. त्यांच्या मनात खुप दिवसापासून घोळत असते की, गरिबांच्या मुलांसाठी शाळा काढायची, रिटायर्ड झाल्यानंतर आपल्या गावी कळमला घर बांधायचं आणि तेथेच शाळा काढायची. त्याप्रमाणे त्यांनी घर बांधलं, धार्मिक विधी आटोपून पंगती पडल्या आणि त्या पंगतीच्या मधनं जंगमसाहेब हिंडत होते. कुणाला काही कमी पडू नये म्हणून पहात होते. ते पहात असताना त्यांच्या मनात विचार आला.

"कळमसारख्या गावातही कामकरी, कष्टकरी, दुष्काळातनं आल्यासारखं अन्नावर तुटून पडत होते. भात, भाजी, भाकरीचाच बेत पण सपाटून खात होते. ..एवढया भरलेल्या गावातही एवढा दुष्काळ". (पृष्ठ 170)

हे सर्व पाहून जंगमसाहेबांच्या मनाला एक समाधान मिळत होते. खूप दिवसापासून मनात असणा-या त्यांच्या विचाराला आज मूर्त स्वरूप आले होते.

"गीताबाई मरण पावली" मध्ये नायकाला त्यांच्या पत्नीने गीताबाई मरण पावली म्हणून सांगितले. ही गीताबाई वत्सला वहिणींच्याकडे कामाला असते. त्यांच्या घरात सतत माणसं यायची आणि त्यांच्यात अन्न खुप उरायचं. तेव्हा म्हणते -

"उरलेलं मातरं करून न टाकता सगळंच्या सगळं द्यायच्या". (पृष्ठ 111)

म्हणजेच गीताबाईंवर उरलं-सुरलं दिल्यानंतर उपकारच वत्सला वहिणींचे होणार होते.

गीताबाई मरण पावल्यानंतर त्यांच्याच वस्तीतल्या कोंगाडयाच्या लोकांनी दोन-दोन रूपये पट्टी काढून तिला जाळली. तुमच्या लोकात एकजूट आहे म्हटल्यावर त्यांच्यातील एक माणूस म्हणतो -

"जूट असंना तर काय करतील? पर्तेकाची तीच त-हा. न देऊन करत्यात काय? ते मेलं तर त्येंच मढं कोण हलवल मग? पर्तेकाला आपल्या मढयाची काळजी हायच की". (पृष्ठ 115)

दुसरे कुणी मेलं तर मदतील यावं हाच त्या लोकांच्या मनातला हेतू दिसतो.

"भिंत" या कथेत झोपडपट्टीतील माणसे इंद्रभवनी जाळपोळ करतात आणि झोपडपट्टयांना जागा देऊ नये असे या उटगी ग्रुपला वाटत होते. आणि त्याप्रमाणे ते प्रयत्नही करत होते. पण या झोपडपट्टीतल्या माणसांची मनं श्रीमंत, पांढरपेशा लोकांना कशी कळणार? त्यांच्याकडे भरपूर पैसा आहे, निसर्गाच्या सानिध्यात आपल्याला राहता येईल म्हणून तर इंद्रभवन उभे करण्याच्या मागे होते. अशीही काही माणसं आपल्याला दिसतात.

**4) घटना प्रसंगातील कलात्मक सौंदर्य**

यादवांच्या कथेत शेतमळयाची वर्णने, निसर्गवर्णने येतात. त्याचबरोबर त्यांच्या काही कथांमध्ये चिडलेली माणसे, आशावादी माणसे दिसतात. अशा पात्रांच्यामध्ये भावनेचे सौंदर्यही जाणवते. या सगळया पात्रांच्यामध्ये फार गुंतागुंती नाहीत. सामान्य माणसाच्या विचारात स्पष्टता जाणवते. कोणकोणत्या पात्रांच्यामध्ये सौंदर्य जाणवते हे पाहू.

"फुलाआत्ती" (मातीखालची माती) यात शिवाला चिडवण्याची दांडगी हौस म्हणून तो फुलाआत्तीला सारखा डिवचत असतो.

"काय फुलाआत्ती?"

"कां रं बाबा?" फुलाआत्तीचा एक हात हलगीवर पडतो.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

"काय चाललयं?"

"शेणी रचाय लागलेय गाडीत "

"कशाला? "

"वडयावर न्हयाला माझ्या सुडक्या". (पृष्ठ 93)

अशी ही फुलाआत्ती जरी तोंडगळ असली तरी मनाने निर्मळ आहे. कुणाचे कोणतेही काम करायला मागे सरत नाही. त्यादृष्टीने "फुलाआत्ती" ही कथा आवडली.

"आक्कुमावशी " मध्ये लेखकाचा भाऊ शिवा मोठा बेरका आहे.

"आक्कुमावशे, उसाच्या दोन्हीबी काक-या मोडत चाललीस की।

"कुठं मोडल्यात रं माझ्या हांटया?"

"न्हवं काय ह्या? जरा अंग सावरून काम कर.

आ-यात मावत न्हाईस नि कशाला येतीस कामाला

"छल माझ्या सुडक्या, थांब, तुझ्या बालाबी तुझ्यासाठी माझ्यागत दांडगीच बायकू आणायला सांगते. मग कसं करतोस बघू?

यात आक्कुमावशी प्रामाणिक आहे. मनाने मोकळी आहे. आपल्यावर झालेल्या विनोदाने ती नं चिडता काम करते. त्यामुळे ही कथा आपल्या मनात ठसते

"तपस्विनी" मध्ये नानी ही परमेश्वरावर नितांत प्रेम करणारी आहे. ती लहान वयापासूनच उपवास करते. नानी आत हुंदडत आल्यावर पाटीलबाबा विचारतात.

"काय नानीसाब, फराळ झाला नाही?"

"आज सोमवार आहे".

"म्हणूनच म्हंटलं उपासाचा फराळ केला कां?"

"उपासादिवशी फराळ करायचा असतो वाटतं?"

"ऑऽऽऽ ! कुणी शिकवलं हे तुम्हाला?" पाटीलबाबा गडबडून हसले.

"आईसाब खात नाहीत".

"तुम्ही करा तसा उपास. आम्हाला भूक आवरत नाही. हांऽ पर भूक लागल्यावर तुम्हीबी थोडं खाऊन घ्या. तिकडं ध्यान देऊ नका". (पृष्ठ 135)

यात नानी ही परमेश्वरावर प्रेम करणारी आहे. शंकरावर तिची श्रध्दा आहे. त्यामुळे लहान वयापासूनच उपवास करते. म्हणूनच 'तपस्विनी'मधील नानी ही व्यक्तीरेखा आवडते.

"धोंडबा खादाडया" मध्ये गणा आणि धोंडबा हे दोघे सख्ख्ये भाऊ. धोंडबा लहान असून तो सतत खात असतो म्हणून जाडजूड आहे. त्याला मुले चिडवतात.

"धोंडया पाणी भरून जाणारी मोट".

"तर गणा पाणी वतून खाली जाणारी भकाळ मोट'.

"धोंडया दीड मणाचं पोतं".

"गण्या झाडून मोकळं केल्यालं पोतं".

"धोंडया दांडगं येळकाट".

"गण्या तुरकाटी". (पृष्ठ 144)

यात गणा आणि धोंडबा या दोघांच्यात खुप फरक आहे. एक जाड तर दुसरा बारीक असतो. धोंडबाचं वर्णन यादवांनी अतिशय विनोदी पध्दतीने चित्रित केले आहे म्हणून ही कथा आवडते.

"आंघोळीचा दिवस" मध्ये आण्णांच्या सुखवस्तू कुटुंबात सगळे नातेवाईक , सुना, नातवंड, मुले एकत्र जमल्यानंतर जो आनंद आहे त्याचे चित्रण या कथेत केले आहे.

दादा आणि वच्चू वहिनी, शिवाजी आणि त्याची बायको ईमली, आणि कथेचा नायक व त्याची बायको शांता, या सर्वांनी आंघोळी केल्या. पण शांता आपल्या नव-याला आंघोळ घालतांना संकोचते, अंगावर लेप लावावा तसं उटणं लावते. तेव्हा कथेचा नायक म्हणतो -

"तू मला तेल लावतेस का लेप?'

"म्हणजे?"

"म्हणजे काय; चांगलं रगड ना अंग. तेल नेट लावून अंगावर घास म्हणजे मुरेल". (पृष्ठ 70)

यातून आण्णांचे कुटुंब आनंदी आहे आणि असा हा आनंद क्वचीतच ठिकाणी पहायला मिळतो. त्यांचे घर म्हणजे एक नंदनवनच असते त्यादृष्टीने मला ही कथा आवडली.

यादवांच्या कथेतील सौदर्य पाहिल्यानंतर ते आपले अनुभव शब्दांच्या माध्यमातून, कथेच्या साच्यातून व्यक्त करतात याची प्रचीती आपणांस येते. त्यांच्या व्यापक जीवनानुभूतीमुळे लेखक म्हणून त्यांना जशी व्यापकता प्राप्त होते. तशीच अनुभवाची, विचारांची, भावनेची व्यापकता अभ्यासकांना, वाचकांनाही प्राप्त होते याची प्रचीती येते. काल्पनिक साहित्यापेक्षा हे वास्तववादी साहित्य समाजाला अधिक कसदारपण देते असेही जाणवते. कलावंत आपल्या व्यापक अनुभवविश्वाला आपल्या बाहेर शब्दाद्वारे फेकतो तेव्हा केशवसूत जे म्हणाले

"तो मज गमले विभूती माझी,

स्फुरत पसरली विश्वा माझी".

या ओळी मनात घोळत राहतात. लेखकाने माझ्यासारख्या सामान्य अभ्यासकाला हा आनंद दिला आणि मानवतेच्या किना-यावर नेऊन ठेवले हीच त्यांच्या कथेतील सौंदर्याची उकल आहे ते माझ्यापुरते मी समजते.

* * * * *